# अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्था संगमनेर यांना टाइम्स समूहाचा एक्सलंट एज्युकेशन ब्रँड आवर्ड











शैक्षणिक क्षेत्रात 1978 पासून उत्कृष्ट कामगिरी करत असलेल्या, के जी टू पी जी शिक्षण देणाऱ्या अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्थाचा (संगमनेर) टाइम्स समुहातर्फे **“एक्सलंट एज्युकेशन ब्रँड”** पुरस्कार देऊन सन्मान सत्कार करण्यात आला.

सदर पुरस्कार नाशिकचे पोलीस कमिशनर मा. संदीप कर्णिक व सिने अभिनेता दिनू मोरया यांच्या हस्ते हॉटेल रेडिसन ब्लू येथे दि.1 डिसेंबर 2024 रोजी झालेल्या समारंभात बहाल करण्यात आला.

सदर पुरस्कार संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त मा.शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डायरेक्टर अकॅडमी डॉ. जी. बी. गुरव यांच्या उपस्थितीत स्वीकारण्यात आला

सदर कार्यक्रमाला अमृतवाहिनी इंजिनिअरिंग प्राचार्य डॉ.एम.ए.व्यंकटेश, तंत्रनिकेतन प्राचार्य प्रा.व्ही.बी. धुमाळ व उपप्राचार्य प्रा.जी.बी.काळे, एमबीए डायरेक्टर डॉ.बी.एम.लोंढ, मॉडेलस्कूल मुख्याध्यापिका शीतल गायकवाड तसेच स्नेहल शेकदार उपस्थित होते.

सदर पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.बाळासाहेब थोरात (मा. महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य) विश्वस्त मा.डॉ सुधीर तांबे(मा.आमदार नाशिक पदवीधर) यांनी टाईम समूहाचे आभार मानले व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.